# एक दिव्य पुरुष ः प्रजापिता ब्रह्मा

भारत ही साधुसंताची, पुण्यात्म्यांची भूमी आहे. भारताने विश्वाला अनेक संत, महंत, गुरु दिले. त्यांनी लोकांना बंधुभाव, प्रेम, करुणा, सहानुभूती, अहिंसा आदी दिव्यगुणांची शिकवण दिली. समाज सुधारकांनाही स्त्रियांना दास्यत्वातुन मुक्तता करण्यासाठी, पुरुषप्रधान संस्कृतीतून मुक्तता करण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले.

त्याच प्रमाणे एका सामान्य कुटूंबात जन्म घेवून सामाजिक सुधारणेबरोरच स्त्रियांना दास्यत्वातून मुक्त करुन नवयुगाची निर्मिती करणारे एक असामान्य व्यक्तिमत्व म्हणजे सिंध प्रांतात निपजलेले एक माणिक लेखराज कृपलानी होय. लेखराज यंचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. पण बालपणीच लेखराजांचे पितृछत्र हरपले. त्यामुळे तयांना त्यांच्या काकांच्या किराणा भुसार मालाच्या दुकानात नोकरी धरावी लागली. पण मुळातच गरीबांबद्दल कणव असल्याने ते दुकानात येणाऱ्या गरीब लोकांना वजनापेक्षा थोडा अधिकच माल देत असत. परंतु हे जेव्हा त्यांच्या काकांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी लेखराजला कामावरुन कमी केले. पुढे लेखराजांनी स्वतःचा छोटया प्रमाणावर गव्हाचा धंदा सुरु केला परखशक्ती व अन्य दिव्य गुणांनी त्यांना सह्योग दिल्याने पुढे ते एक मोठे जवाहिर झाले. त्यांनी आपले दुकान कलकत्ता येथे थाटले. सामान्य लोकांप्रमाणेच राजे, संस्थानिकही त्यांचे गिऱ्हाईक होते. सचोटीने व्यवहार करुन त्यांनी अमाप पैसा मिळविला. अमाप पेसा हा एकतर कैफ चढवितो किंवा वैराग्याप्रत नेतो. अक्षरशः सोन्याच्या चमच्याने दूध पिणारा बाळ सिध्दार्थ मोठा झाल्यावरही वैभवात असताना दैवयोगाने एक दिवस त्याला वैराग्य प्राप्त झाले. त्यानेच पुढे बौध्द धर्माची स्थापना केली. असेच काहीसे दादा लेखराज यांच्या बाबतीत झाले. त्यांी यशोदा नावाच्या मुलीशी लग्न केले. संसार केला. मुलांना जन्म दिला. जवाहिऱ्याच्या धंद्यात खोऱ्याने संपत्ती ओढली. पण मुळचा पिंड आध्यात्माचा असल्याने ऐहिक सुखाचा त्याग करुन ते आध्यात्माकडे वळले. ते नारायणाचे भक्त होते. लक्ष्मीनारायणाच्या चित्रातील लक्ष्मी ही नारायणाचे पाय चेपते आहे, हे त्यांना पटत नव्हते. म्हणून त्यांनी चित्रकाराला बोलावून चित्रात परिवर्तन करविले. यातुनच त्यांचा स्त्रियाबद्दलचा आदरभाव व्यक्त होतो. त्यांनी तीर्थयात्रा केल्या. बारा गुरु केले. पुढे वयाच्या ६० व्या वर्षी म्हणजे १९३६ साली प्रत्यक्ष शिव परमात्म्याने त्यांच्या शरीरात दिव्य प्रवेश करुन स्वतःचा परिचय दिला निजानंद स्वरुप्म शिवोहम् शिवोहम्। प्रकाश स्वरुपम् शिवोहम् शिवोहम्। ज्ञान स्वरुपम् शिवोहम् शिवोहम्। परमात्मा शिव यांनी परकाया प्रवेश करुन दादांचे नाव प्रजापिता ब्रह्मा ठेवले व तुझ्या मार्फत मी नव्या, सत्ययुगी दुनियेची स्थापना करणार आहे, असे सांगितले. ब्रह्माबाबांनी स्वतःच्या घरी ऊँची ध्वनी करणाऱ्यांची ''ॐ मंडली'' नामक संस्था स्थापन केली. आपल्या धंद्यातील सुमारे १८ लाख रुपयांचे भांडवल काढून घेऊन कन्या-मातांची एक समिती नेमून त्यांच्या हवाली केले व त्याचा विनियोग विश्व कलयाणासाठी व खास करून स्त्रियांच्या उध्दारासाठी करावा असा आपला मनोदय व्यक्त केला. माता जगदम्बा सरस्वती यांची प्रथम अध्यक्षा म्हणून नियुक्ती झाली. पुढे १९५१ मध्ये ही संस्था मा.आबू येथे स्थलंतरीत झाली व तीचे पुढे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय या नावाने ओळखली जाऊ लागली.

३२ वर्षे योग तपस्या, जातिधर्म निरेक्षता विश्व सेवा करुन वयाच्या ९३ व्या वर्षी म्हणजे १८ जानेवारी १९६९ रोजी ब्रह्माबाबांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व अव्यक्त आकारी रूप धारण करून सूक्ष्मलोकाम गेले. कोणत्याही व्यक्तिच्या पार्थिव देहावर अत्यंसंस्कार सरकारने ठरवून दिलेल्या जागीच करावे लागतात. परंतु परमात्मा शिव यांनी आपला रथ बनविलेल्या पिताश्रीच्या पवित्र देहावर अंत्यसंस्कार मा.आबू येथील मधूबनात करण्याची परवानगी ब्रह्माकुमारी संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितली. परंतु ही बाब त्यांच्या अखत्यारीतील नसल्याने त्यांनी

राजस्थान सरकारची संमत्ती मिळाल्यानंतर परवानगी दिली.  ज्या जागी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले, तिथे त्यांचे यादगार म्हणून शान्तिस्तंभ उभा आहे.

१९६९ पासून या विश्व विद्यालयाची धूरा राजयोगिनी, दादी प्रकाशमणि आपल्या समवयस्क राजयोगिनींच्या सहयोगाने सांभाळत आहेत.  या विश्व विद्यालयाच्या शाखा सुमारे १०० हून अधिक देशात असून सात लाख विद्यार्थी आपले भाग्य बनवित आहेत.  सर्व सेवाकेंद्रांचा कारभार ब्रह्माकुमारी पाहतात हे या विश्व विद्यालयाचे आगळे वेगळे वैशिष्ट आहे.

शिव परमात्म्याच्या आदेशानुसार पिताश्री ब्रह्माबाबांनी मानवतेसाङ्गी व खास करुन कन्या-मातांसाङ्गी सुरु केलेले एवढे मोङ्गे विश्व विद्यालय हे जगातील एकमेव असावे. अव्यक्त झाल्याला दि. १८ जानेवारी २००९ रोजी ४० वर्षे पूर्ण होत आहेत.  त्यानिमित्ताने पिताश्रींना सर्व ब्रह्मावत्सांतर्फे ही आदरांजली !

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com